क्र नपप्रसं कक्ष-५/संवर्ग/निवृत्ती-वेतन/२०१३
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला
सर पोचखानवाला मार्ग,वरळी. मुंबई - ३०.
दिनांक :- 1 3 MAY 2014

प्रति,

१) विभागीय आयुक्त तथा
प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन (सर्व)

२)जिल्हाधिकारी (सर्व)

विषय :- नियुक्ती प्राधिकारी यांनी नगरपरिषद कर्मचारी राज्यस्तरीय संवर्गात समावेशन झालेल्या नगरपरिषद कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे निवृत्तीवेतन देणेबाबत, तसेच निवृत्तीवेतन-अंशदान व रजा-अंशदान रक्कम शासनास प्रदान करणेबाबत..

संदर्भ :- या संचालनालयाचे सम क्रमांकाचे पत्र दि.२१.०५.२०१३

संवर्ग सेवा-शर्ती नियम, २००६ व सुधारीत अधिसूचना दि.२८.०१.२०१० मधील तरतुदीनुसार नगरपरिषद कर्मचा-यांची समावेशनाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. या समावेशन झालेल्या कर्मचा-यांच्या निवृत्तीवेतनाचे लाभ अदा करणेबाबत, तसेच निवृत्तीवेतन अंशदान व रजा अशंदान रक्कम शासनास प्रदान करणेबाबत संवर्ग सेवा-शर्ती नियम, २००६ मध्ये अनुक्रमे नियम १० व ११ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे.

०२. याबाबत मा. महालेखाकार कार्यालय यांनी दि.१७.०५.२०१३ च्या पत्रान्वये सबंधित रकमेचा भरणा कोणत्या लेखाशिर्षाखाली जमा करावा व कशाप्रकारे परिगणना करावी याबाबत सूचना दिलेल्या आहेत. (सोबत पत्राची प्रत व परिगणनेचा तक्ता जोडलेला आहे) मा. महालेखाकार कार्यालय यांनी खालीप्रमाणे लेखाशिर्ष कळविलेला आहे.

१) मुख्य लेखाशिर्ष निवृत्ती वेतन अंशदान जमा करणे (जमाशिर्ष)
००७१- निवृत्ती वेतन व इतर निवृत्ती वेतन लाभ
१०१- अंशदाने व अभिदाने

२) मुख्य लेखाशिर्ष रजावेतन अंशदान जमा करणे (जमाशिर्ष)
०२१७- नगर विकास
८००- इतर जमा
(०१)(०६) - रजा वेतन अंशदान
०२१७०१५२



Scanned with CamScanner

०३. आता निवडश्रेणी/श्रेणी-अ/श्रेणी-ब/श्रेणी-क-१/श्रेणी-क-२ या संवर्गात ज्या नगरपरिषद कर्मचा-यांचे सवर्ग सेवा-शर्ती नियम, २००६ मधील नियम ५ (६) अंतिम समावेशन झालेल्या आहे व त्यानुसार त्याना नगरपरिषदेतील संवर्ग पदावर पदस्थापना दिलेल्या आहेत. अशा सर्व संवर्ग कर्मचा-यांची निवृत्तीवेतन अंशदान व रजावेतन अंशदान वर्गणीची अंतिम समावेशनाच्या तारखेपासून परिगणना करुन, ते ज्या नगरपरिषदेत पूर्वी कार्यरत होते, किंवा सद्या कार्यरत आहेत त्या नगरपरिषदेने भरणे आवश्यक आहे.

०४. सबब आपल्या विभागातील व जिल्हयातील नगरपरिषदेत कार्यरत असलेले निवडश्रेणी/श्रेणी-अ/श्रेणी-ब/श्रेणी-क-१/श्रेणी-क-२ या संवर्गात सेवा-शर्ती नियम, २००६ मधील नियम ५ (६) नुसार अंतिम समावेशन झालेले, तसेच पदस्थापना दिलेले, बदलीने कार्यरत असलेले व सरळसेवेने नियुक्त झालेले अशा सर्व संवर्ग कर्मचा-यांच्या अंतिम समावेशनाच्या तारखेपासून, संवर्ग श्रेणी निहाय नियमानुसार वेतननिश्चिती करुन, सेवापुस्तकात नोंदी घेणेबाबत, तसेच या सर्व संवर्ग कर्मचा-यांचा मागील सेवेचा कालावधी धरुन, निवृत्तीवेतन अंशदान व रजावेतन अंशदान वर्गणीची परिगणना करणेबाबत, परिगणेनुसार निघालेली रक्कम परिच्छेद क्र.०२ मध्ये नमूद केलेल्या लेखाशिर्षा मध्ये भरणेबाबत तसेच निवृत्त / मयत झालेल्या कर्मचा-यांचे वर्गणी तातडीने भरण्याबाबत तसेच जे कर्मचारी येत्या दोन वर्षात निवृत्त होणार आहेत त्यांची वर्गणी प्राधान्याने भरण्याबाबत संबंधित मुख्याधिकारी यांना तात्काळ सूचना द्याव्यात. याबाबतीत विलंब झाल्यास संबधित मुख्याधिकारी, जिल्हाप्रकल्प अधिकारी / जिल्हाप्रशासन अधिकारी व सहायक प्रादेशिक संचालक यांना जबाबदार धरण्यात येईल अशा सक्त सूचना देण्यात याव्यात.

०५. तरी आपण संबंधित संवर्ग कर्मचा-यांचे नियुक्ती प्राधिकारी असल्याने, संवर्ग सेवा-शर्ती नियम, २००६ व सुधारीत अधिसूचना दि.२८.०१.२०१० मधील तरतुदीनुसार समावेशन झालेल्या कर्मचा-यांचे निवृत्तीवेतन अंशदान व रजा अशंदान रक्कम शासनाच्या संबधित लेखाशीषार्मध्ये जमा करण्याची जबाबदारी ही नियुक्ती प्राधिकारी यांची आहे.त्यामुळे निवृत्तीवेतन अंशदान व रजा अशंदान रक्कम संबधित लेखाशीर्षामध्ये ३० दिवसात भरण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी व पुर्तता अहवाल १५ जुलै २०१४ पर्यंत या संचालनालयास सादर करावा ही विनंती.

13/5/2014

( डॉ. पुरुषोत्तम भापकर )
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

Scanned with CamScanner